विषय:- कार्यालयीन उपस्थितीबाबत...

जा.क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि- ११२/२०२०
सामान्य प्रशासन विभाग
सातारा जिल्हा परिषद सातारा
दिनांक -१८/०३/२०२०

वाचा :- १. इकडील परिपत्रक क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि-७३/२०२० दिनांक २७/०२/२०२०.
२. इकडील परिपत्रक क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि-८२/२०२० दिनांक ०५/०३/२०२०.

परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे कळविणेत येते की , महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासननिर्णय क्र.समय-२०१६/प्र.क्र.६२/१८(र.व.का.) दिनांक २४/०२/२०२० नुसार राज्यातील शासकीय /निमशासकीय कार्यालयांतील कामकाजाचा पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात आलेला असून दिनांक २९ फेब्रुवारी २०२० पासून शासनाने काकाजाबाबत निर्दशित केलेल्या सुचनानुसार कार्यालयाची पाच दिवसांची कामकाजाची वेळ वर्ग १ ते वर्ग ३ अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी असून वर्ग ४ कर्मचा-यांसाठी सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत अशी ठेवण्यात आलेली असल्याने या कार्यालयीन वेळेची अंमलबजावणी होणेबाबत परिपत्रक दिनांक २७/०२/२०२० व दिनांक ०५/०३/२०२० अन्वये योग्य त्या सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

तथापि सदर परिपत्रकांतील सुचनांनुसार योग्य ती दक्षता अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयीन उपस्थिती दर्शविण्यात येत नसल्याचे सातारा जिल्हयातील दैनिकांमध्ये कर्मचा-यांचे वर्तन हे बेशिस्तीचे असून त्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने योग्य ती दक्षता घ्यावी अशा बातम्या येत असल्याचे माझे निदर्शनास आले आहे. ही बाब योग्य नसून कार्यालयीन शिस्तीस सोडून आहे. सबब सर्व खातेप्रमुख/गटविकास अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, शासनाने ठरवून दिलेल्या वेळेप्रमाणे कर्मचा-यांनी कार्यालयीन कामकाज करणेबाबत योग्य त्या सुचना देण्यात याव्यात. तसेच सर्व खातेप्रमुख व कार्यालयप्रमुख यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून कर्मचा-यांचे हजेरीपत्रक व फिरती नोंदवहीची तपासणी आठवडयातून दोन वेळा करण्यात यावी. जे कर्मचारी/अधिकारीकार्यालयीन वेळेत उपस्थित राहत नाहीत त्यांचेविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी.

तरी आठवडयातून दोन वेळा हजेरीपत्रक व फिरती नोंदवही कार्यालयप्रमुखांनी तपासणी करुन त्यामध्ये शासनाने ठरवून दिलेल्या वेळेनुसार कर्मचारी कामकाज करणेस कुचराई करत असल्याचे दिसून आल्यास त्यांचेविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील तरतुदींचा भंग असल्याचे गृहीत धरुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील तरतुदीनुसार आवश्यक व उचित कार्यवाही करावी याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा
# ९४२२९९३३३३
ceozpstr@gmail.com

प्रत :- मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत :- मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- मा. सभापती, विषय समिती (सर्व), जि.प.सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांना माहितीसाठी .
प्रत:-प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जि.प.सातारा यांना माहितीसाठी .
प्रत :- सर्व विभागप्रमुख , जिल्हा परिषद सातारा यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- गटविकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व) जि. सातारा यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.